**कृषी सल्ला**

**फेब्रुवारी २०२६**

**सुरु ऊस (Sugarcane) :-**

- सुरु ऊसाची लागवड १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.
- सुरु ऊसाची लागवड सरी-वरंबा पद्धत किंवा जोड ओळ पद्धत (पट्टा पद्धत). दोन सरींतील अंतर ५, ६ किंवा ७ फूट ठेवावे.
- सुरु ऊस लागवडीसाठी को-८६०३२, फुले -०२६५, पी.डी.एन. १३००७, पी.डी.एन. १५००६, पी.डी.एन. १५०१२ चा वापर करावा.
- ऊस लागवडीसाठी त्रिस्तरीय बेणे मळ्यातील ऊस बेण्याचा वापर करावा. बेणे भेसळरहित ९ ते ११ महिने वयाचे असावे. बेणे जाड, रसरशीत, लांब कांड्याचे असावे. डोळ्यांची वाढ चांगली झालेली असावी व डोळे फुगीर असावे. बारा महिन्यापेक्षा जास्त वयाचा ऊस बेण्यासाठी वापरू नये. पाण्याचा ताण पडलेला आखूड कांड्यांचा, दशी पडलेला, पोकळ ऊस बेणे म्हणून वापरू नये. दर ३ - ४ वर्षातून एकदा बेण्यात बदल करावा.
- ऊस लागवडीसाठी त्रिस्तरीय बेणे मळ्यातील बेणेच ऊस लागवडीसाठी वापरावे. ३ ते ४ वर्षांनी बेण्यात बदल करावा. ऊसाची लागवड एक डोळा दोन डोळ्यांची टिपरी वापरून किंवा ऊस रोपांचा वापर करून करावी. दोन डोळ्यांच्या टिपरीतील अंतर १५ ते ३० सें.मी. ठेवावे. दोन रोपांमधील अंतर ६० सें.मी. ठेवावे. ऊसाची लागवड शक्यतो ओल्या पद्धतीनेच करावी.
- ऊस लागवडीपूर्वी ३० मिली मॅलॅथिअॉन अधिक २० ग्रॅम बाविस्टीन किंवा २० मिली क्लोरोपायरीफॉस (५० %) अधिक २० मिली ह्युमिक ॲसिड १० लिटर मिसळून त्या द्रावणात बेण्याची टिपरी १० ते १५ मिनिट बुडऊन लावावीत. त्यामुळे मुळकुज, कांडीकुज व खवले किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.
- त्याचप्रमाणे जिवाणू खतांची बेणे प्रक्रिया १० लिटर पाण्यात प्रत्येकी ५०मिली द्रवरूप ॲसिटोबॅक्टर, पी.एस.बी. व के मोबीलायझर मिसळून त्या द्रावणात बेणे १५ ते २० मिनिटे बुडऊन लावावीत.

**उन्हाळी भुईमूग :-**

- उन्हाळी भुईमुग लागवड फुले उन्नती, फुले प्रगती, टीजी-२६, फुले वारणा, एस.बी.-११, टी.ए.जी. २४, जे.एल.२८६, टी.पी.जी.-४१, टी.जी.-२६, जे.एल.-५०१ फुले आर.एच.आर.जी.-६०११ व फुले उन्नती या सुधारित वाणांचा वापर करून करावी.
- भुईमुग पेरणीसाठी वाणानुसार १०० ते १२५ किलो प्रति हेक्टरी बियाणे पुरेसे होते.
- उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी. भुईमुगाची पेरणीच्या वेळी रात्रीचे किमान तापमान १८ ° अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे.
- उन्हाळी भुईमुग लागवड रुंद वाफा-सरी पद्धत (BBF) सर्वात उत्तम. टोकण पद्धतीने लागवड करावी. भुईमुग पेरणीसाठी वाणानुसार १०० ते १२५ किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे.
- पेरणीपूर्वी प्रति १० किलो बियाण्यास ५० ग्रॅम थायरम किंवा २० ग्रॅम कार्बेन्डाझीम किंवा ३० ग्रॅम मन्कॉझेब किंवा ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक बियाण्यास चोळावे.

- यानंतर प्रति १० किलो बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम आणि स्फुरद विरघळणा-या जिवाणूसंवर्धकाची प्रक्रिया करावी.
- उपट्या जातीसाठी ३० x १० सें.मी. निमपसऱ्या जातीसाठी : ३० x १५ सें.मी. उन्हाळी हंगामात जमीन ओलावून वापश्यावर पाभरीने अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. सुरु उसात उपट्या भुईमुग वाणांची आंतरपीक म्हणून लागवड करण्यासाठी ९० से.मी. अंतरावर सऱ्या पाडून उसाची लागवड केल्यानंतर एक आठवड्याने १० से.मी. अंतरावर सरीच्या दोन्ही बाजूस उन्हाळी भुईमुगाची लागवड करावी.
- शेवटच्या कुळवाच्या वेळी २० गाड्या कंपोस्ट किंवा चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र अधिक ५० किलो स्फुरद द्यावे. स्फुरदयुक्त खते सिंगल सुपर फॉस्फेटद्वारे दिल्यास त्यामध्ये असलेल्या गंधकाचा भुईमुगासारख्या पिकास चांगला फायदा होतो.
  भुईमुगाच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खत मात्रेसोबत ४०० किलो जिप्सम (२०० किलो पेरणीवेळी व २०० किलो आऱ्या सुटताना) जमिनीत मिसळून द्यावे.

**मूग :-**

- उन्हाळी मुगाची पेरणी १५ फेब्रुवारी ते १० मार्च च्या दरम्यान करावी. मान्सूनच्या पावसात पिक सापडू नये म्हणून मुगाची उशिरा पेरणी शक्यतो टाळावी.
- मुगाचे अपेक्षित उत्पादन मिळण्यासाठी हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. त्यासाठी हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे. मुगाची पेरणी दोन ओळीत ३० सें.मी. अंतर व दोन रोपांत १० सें.मी. अंतर ठेऊन करावी.
- मुग पिकाची लागवड वैभव पी.के.व्ही.एके.एम.-४ पी.के.व्ही.ग्रीन बी.एम.२००३-२, बी. एम. २००१-१ बी.पी.एम.आर. ८ या सुधारित वाणांचा वापर करून करावी.
- पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम थायरम अधिक २ ग्रॅम कार्बेन्डँझीम किंवा ट्रायकोडर्मा ची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रति १० ते १५ किलो बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. या जिवाणू संवर्धकाची गुळाच्या थंड पाण्यात मिसळून बीजप्रक्रिया करावी.
- प्रति हेक्टरी ४ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेवटच्या कुळवणीच्या वेळी शेतात मिसळून द्यावे.पेरणी करताना २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद (१०० किलो डाय अमोनियम फॉस्फेट) किंवा ४३ किलो युरिया आणि २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व पालाश ३० किलो प्रति हेक्टरी द्यावे.

1. आंबा फळधारणा व उत्पादन वाढीसाठी मोहर फुटण्याच्या वेळी १ टक्का पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेटची आणि त्यानंतर १ महिन्यांनी १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.
2. केळीचा घड पूर्ण निसल्यावर व केळफुल तोडल्यावर त्यावर १०लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फोस्फेट अधिक १०० ग्रॅम यूरिया अधिक १० मिलि स्टिकर मिसळून फवारणी करावी.
3. केळफुल कापल्यावर एकदा व त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटाश मिसळून फवारणी करावी.
4. केळफुल कापल्यानंतर केळीचे घड ०.५ मि.मी. जाडीच्या ७५ x १०० से.मी. आकाराच्या ६ टक्के सच्छिद्र प्लास्टिक पिशव्यांनी ( स्कर्टिंग बॅगनी) झाकावेत. यामुळे घडचे रस शोषक किडींपासून सरक्षण होते व केळी घडाची गुणवत्ता टिकून राहते व निर्यातक्षम उत्पन्न घेणे श्यक्य होते.
5. केळी बागेमध्ये बनाना स्पेशल चा वापर लागवडीनंतर ५ महिन्यापासून प्रत्येक महिन्याला १० महिन्यापर्यंत करावा. त्यासाठी १५ लिटर पाण्यात ७५ ग्रॅम बनाना स्पेशल अधिक १ शांपुचा पाऊच व २ लिंबाचा रस एकत्र करून फवारणी करावी.
6. उन्हाळ्यात डाळिंब फळांवर होणाऱ्या जास्त प्रखर सूर्यप्रकाश्यामुळे निर्माण होणाऱ्या डागाच्या (सनबर्निंग) नियंत्रणासाठी पी.पी. नान ओवन बॅगचा वापर करावा.
7. कांदा पिकामध्ये सिलिकॉन या अन्नद्रव्याचा वापर फवारणीद्वारे रोपवाटीकेमध्ये बियाणे पेरणी नंतर २५ दिवसांनी, पुनरलागवाडीनंतर २० दिवसांनी व पुनरलागवाडीनंतर ३० दिवसांनी २ ग्रॅम/ लिटर पाणी या प्रमाणात ३ वेळा करावा.

**ऊस -** पाने खानारी अळी आणि खोड कीड व्यवस्थापन

- खोडवा ऊसातील पाने खाणा-या आळीच्या नियंत्रणासाठी केराजीन 2 मिली प्रती 10 लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी

**खोडकिड नियत्रंणासाठी**

- गंध सापळे 10 प्रती एकर प्रमाणे लावावेत
- ट्रायकोग्रामा कार्ड 5 प्रती एकर प्रमाणे 15 दिवसाचं े अंतराने तिन वेळा लावावेत
- आवश्यकतेनुसार किटकनाशकाची फवारणी करावी त्यासाठी

**डाळिंब**

- डाळींबाच्या खोडकिडीच्या नियंत्रणासाठी 10 लिटर पाण्यात गेरू 4 किलो + कॉपर ऑक्सिक्लोराईड 25 ग्रॅम + निम ऑईल 20 मिली मिसळून झाडाच्या खोडास पेस्ट लावावी
- सुत्रकृमीच्या व्यावस्थापनासाठी बागेत झेंडूची लागवड करावी
- डाळींबाचा बहार धरताना 2 टन निबोळी पेंड अथवा कार्बोफ्युरा ॅन 3 टक्के 135 किलो प्रती हेक्टरी प्रमाणे द्यावे
- बागेत हिरवळीचे पिक ताग धैंचा घ्यावे.
- तेल्या रोगाच्या व्यावस्थापनासाठी झाडाच्या खोडवर निमऑईल+ बॅक्टरीनाशक 500 पीपीएम+कॅप्टन 0.5 टक्केची पेस्ट लावावी

**केळी**

- पर्णगुच्छ रोगाचे व्यवस्थापणासाठी प्रादुर्भावग्रस्त झाडे उपटुन टाकावीत
- झाडावर आंतरप्रवाही किटकनाशकाची फवारणी करावी
- बागेभोवती वेलवर्गिय पिके घेण्याचे टाळावे

**आंबा मोहर**

- तुडतुडे व भुरी चे नियंत्रणासाठी फा ॅसेला ॅन 10 मिली +मॅन्कोझेब 20 ग्रॅम प्रती 10 लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी
- आबां पिकावरील मॉलफॉरमेशन व्यावस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त फांदया काढून नष्ट कराव्यात व कार्बेडाझिम 25 ग्रम प्रती 10लिटर पाणी बुरशीनाशक व त्यानंतर एन.ए.ए. 40 पीपी एम (40 मिली प्रती 100 लिटर पाणी ) फवारणी द्यावी

**गहु**

- लोंब्या भरण्याच्या आवस्थेत 0.5 टक्के युरीया + झिंकसल्फेट 0.5 टक्के च्या 15 दिवसाचे अंतराने दोन फवारण्या कराव्यात
- पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी

**टोमॅटो**

- लागवडीसाठी योग्य त्या जातीची निवड करावी , उदा. फुले राजा , धनश्री , राजश्री ई .
- लागवडीपूर्वी बियाण्यास अॅझाटोबॅक्टर,पी.एस.बी,के.एम.बी, प्रत्येकी 25 ते 50 ग्रॅम प्रती किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी , बियाण्यास बीजप्रक्रिया केली नसल्यास पुर्नःरलागवडीचेवेळी रोपाच्या मुळाना जीवाणू प्रक्रिया करावी

- लागवड दोन ओळीत 90 से.मी. व दोन रोपात 30 से.मी. अंतरावर 1 मिटर रूंद 15 सें.मी. उंच गादी वाफयावर करावी
- लागवडचेवेळी बेसल डोस सूक्ष्म अन्न घटकासह शेणखतासोबत मिसळून मिसळूण जमीनीतून द्यावे
- त्यानंतर 10 ते 15 दिवसानी शेणखतासोबत अॅझाटोबॅक्टर,पी.एस.बी,के.एम.बी प्रत्येकी 4 किलो व ट्रायकोडर्मा, सुडोमोनस ,पॅसिलिओमायसीस प्रत्येकी 2 किलो प्रती एकर प्रमाणे जमिनीतून द्यावे

**मिरची**

- अॅलिएट 10 मिली प्रती 10 लि पाणी या प्रमाणे प्रती रोप 0 .5 ते 1 लिटर द्रावणची आळवणी करावी
- त्यांनतर 15 दिवसानी ट्रायकोडर्मा 5 किलो + सुडोमोनस 5 कि $ पॅसिलिओमायसीस 5 किलो 200 कि शेणखतात मिसळून जमिनीतून द्यावे
- चुरडामुरडा च्या बंदोबस्तासाठी डायमीथोएट 20 मिली किवा कॉनफिडॉर 4 मिलि प्रती 10 लिटर पाण्यातून फवारणी करावी
- फुलगळ थाबंवणेसाठी एन.ए.ए. 4 मिली प्रती 10 लिटर पाण्यातून 15 दिवसाचे अंतराने 2 फवारण्या कराव्यात
- भुरी रोगाचे नियंत्रणासाठी गंधक 30 ग्रॅम प्रती 10 लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- मर रोगाचे नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा 2 किलो प्रती एकर प्रमाणे शेणखता सोबत जमिनितून घालावे.

**वांगीं –**मर रोगाचे बंदोबस्तााठी झाडाना एलिएट 10 मीली 10 लिटर पाण्यातून आळवणी द्यावी आणि त्यानंतर ट्रायकोडर्मा 2 कि+ सुडोमानस 2 कि +पॅसीलिओमायसीस 2 कि प्रती एकर प्रमाणे शेणखतातून वापरावे

- सुक्ष्मअन्नद्रव्ये झिंकसल्फेट,फेरससल्फेट,मॅग्नेशिअमसल्फेट,मॅगेंनिजसल्फेट 10 किलो प्रतेकी प्रती एकर प्रमाणे जमीनीतून शेणखतासोबत द्यावे
- सूत्रकृमी नियंत्रणासाठी निबोळी पेंड 2000 किलो सोबत कार्बोफयुरॉन किवा फोरेट दाणेदार 8 किलो प्रती एकर प्रमाणे वापरावे

**पपई - फळसड**

- कोलॅटोट्रिकम बुरशीमुळे होणारी फळसड कमी करण्यासठी कॉपरऑक्सिक्लोराईड 3 ग्रॅम किवा कार्बेडायझीम 1 ग्रॅम किवा डायईथेन एम 45, 2 ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे 1 ते 2 फवारण्या कराव्यात
- काढणी झालेली फळे 49 डीग्री सेंटीग्रेड तापमानाच्या गरम पाण्यात 20 मिनिटे बुडवून नंतर 20 मिनिटे थंड पाण्यात बुडवून ठेवावीत व नंतर कोरडी करून पॅकिंग करून विक्रस पाठवावीत

**सीताफळ –** फुलकळीगळ रोखण्यासाठी

- फुलगळ थाबंवणेसाठी एन.ए.ए 4 मिली प्रती 10 लिटर पाण्यातून 15 दिवसाचे अंतराने 2 फवारण्या कराव्यात, किटकनाशके व ईतर रसायने वापरताना घ्यावयाची काळजी

- रसायनाचे लेबल क्लेम, पीएचआय, एमआरएल तपासावे, बॅन किंवा रेस्ट्रिक्टेड आहे का ते पहावे रसायनाचा गट तपासावा, खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे, तसेच संबधीत तज्ञाचा सल्ला घेउन वापर करावा

**म्हैस पालकांसाठी व्यवस्थापन टीप - फेब्रुवरी २०२६**

**लक्षणे :** किमान प्रभाव.

व्यवस्थापनः सावली आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा समावेश करा. गोठ्यामध्ये हवा खेळती ठेवा योग्य वायुवीजन.

**आहार नियोजन :** पुरेशी ऊर्जा, प्रथिने, जीवनसत्त्वे आणिखनिजे यांचा समावेश असणारा समतोल आहार द्या. ताजा आणि स्वच्छ चारा, वैरण किंवा उच्च गुणवत्तेच्या गवताचा समावेश करा. दर्जेदार द्विदलवर्गीय चारा जसे की लसुन घास, बरसिम व एकदल वर्गीय चारा जसे की मका, हायब्रीड नेपियर, ज्वारी यांचा पुरवठा करा. नेहमी शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करा.

**आरोग्यः** आजार किंवा रोगाच्या कोणत्याही लक्षणांसाठी कळपाचे निरीक्षण करा. योग्य लसीकरण आणि जंतनाशक वेळापत्रकांचे पालन केल्याची खात्री करा. कीटकांचा प्रभाव कमी करण्यासाठी माशी नियंत्रण कार्यक्रम राबवा. पुनरुत्पादक आरोग्य राखण्यासाठी उच्च संतुलित ऊर्जा आहार द्या

**संकरीत जनावरेगोठा व्यवस्थापन टीप - फेब्रुवरी २०२६**

**लक्षणे :** कमी प्रभाव,वाढलेले श्वसन यांसारखी प्रारंभिकचिन्हे.

**व्यवस्थापनः** जनावरे थंड विश्रांतीच्या ठिकाणी सावलीमध्येठेवा. उष्णतेच्या ताणाची लक्षणे तपासण्याची वारंवारता वाढवा, जसे की श्वासोच्छवासाचा दर वाढणे किंवा लाळ येणे. उच्च दर्जाचे चारा द्या (लसुन घास, बरसिम, मका, हायब्रीड नेपियर, ज्वारी) गोठ्यामध्ये हवा खेळती ठेवा (पुरेसे वायुवीजन). उर्जेचे सेवन वाढवण्यासाठी पशुखाद्यामध्ये बाय पास फॅट चा समावेश करा. दिवसाच्या सर्वात उष्ण काळात जनावरे हाताळणे किंवा हलविणे टाळा.

**आहार नियोजन :** सहज पचण्या योग्य घटकांचा आहारातसमावेश करून आहारातील ऊर्जा वाढवा. निर्जलीकरण टाळण्यासाठी ताज्या, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करा. इलेक्ट्रोलाइट पातळी राखण्यासाठी पाण्यात किंवा आहारामध्ये इलेक्ट्रोलाइट्सचा वापर करावा.

**आरोग्यः** उष्माघात किंवा उष्णतेमुळे येणारा थकवा अशा उष्मा-संबंधित आजारांच्या कोणत्याही लक्षणांसाठी कळपाचे निरीक्षण करा. उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी अतिरिक्त सावली निर्माण करा किंवा पंख्याचा वापर करून थंडावा निर्माण करा

- ऊस तुटून गेल्यानंतर उसाचे पाचट जाळू नये. पाचट सरीत दाबून घ्यावे अथवा पाचट कुट्टी यंत्राने पाचटाची कुट्टी करावी.
- ऊस तुटून गेल्यानंतर, ट्रक्टर चलित खोडवा ऊस व्यवस्थापन यंत्राचा वापर करावा. बुडख्या छाटणी, बगल्या फोडणी व पेरून खत देणे ही तीनही कामे एकाच वेळी होतात.
- हरभरा, मका यासारख्या पिकात, कोळपणी साठी मोघी कोळप्याचा वापर करावा.

**कृषी सल्ला :-** गहू पिके साधारण पणे पोटरी अवस्थेत तसेच ओंबी भरण्याच्या अवस्थेत असल्याने कृषी विज्ञान केंद्र दहीगाव -ने यांच्यावतीने शेतकऱ्यांना कृषी सल्ला देण्यात येतो की गहू पिकास  पाणी देऊन फवारणी द्वारे 19 :19 :19 नत्र, स्फुरद व पालास या मुख्य अन्नद्रव्य सोबत बाजारातील ग्रेड  नंबर दोन या सूक्ष्म अन्नद्रव्याचा वापर करावा. त्याच बरोबर बाजारात 0.001 एपीएमचे जिब्रेलिक आम्ल (संजीवक )उपलब्ध असून त्याचा वापर केल्यास उत्पादनात चांगली वाढ दिसून येते.